# प्रेस नोट

**दिनांक- ०७/११/२०१९**

दिनांक १२/११/२०१९ पासून दिनांक १८/११/२०१९ पर्यंत कर्वे रोडवरील रसशाला चौकात मेट्रोच्या पिअर क्र. १३९ आणि पिअर क्र. जी. सी. १ मध्ये सेगमेंट लिफ्टिंग चे काम करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये रसशाला चौक वाहतुकीसाठी अंशतः बंद ठेवण्यात येणार आहे. सदर कामामुळे एस. एम. जोशी पुलाकडून प्रभात रोडला जाऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी स्वातंत्र्य चौकात यू-टर्न करून प्रभात रोडला जावे. तसेच प्रभात रोड कडून एस. एम. जोशी पुलाकडे जाऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी यशवंतराव चव्हाण चौकात यू -टर्न करून जावे. सहकार्याबद्दल आभारी आहोत.

(अजय कुमार )
अति. मुख्य प्रकल्प व्यवस्थापक
रिच-२, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन पुणे.

## ना-हरकत पत्र

जा.क्र.पोउआ/वाह/नियो6628/पुणे/२०१९.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांचे कार्या.
पुणे दिनांक :-10/०८/२०१९.

प्रति,
एक्झक्युटीव्ह डायरेक्टर
महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपोरेशन लि. पुणे.

**विषय** :- पुणे मेट्राचे वनाज,कोथरुड कचरा डेपो ते नळस्टॉप चौक ते डेक्कन कॉर्नर या दरम्यान कामासाठी वाहतुक शाखेचे ना-हरकत पत्राच्या मुदतवाढीबाबत...
संदर्भ :- मे. एन.सी.सी. लिमीटेड यांचेकडील पत्र दिनांक २५/०६/२०१९

---

उपरोक्त विषय व संदर्भान्वये, वनाज,कोथरुड कचरा डेपो ते नळस्टॉप चौक या दरम्यान मेट्रो कॉरिडॉरचे कामाची परवानगी, आपणांकडून मे. एन.सी.सी.लि. पुणे कंपणीस देण्यात आलेली आहे.

सदर कामाअंतर्गत, वनाज,कोथरुड कचरा डेपो ते नळस्टॉप चौक ते डेक्कन कॉर्नर या दरम्यान पुणे मेट्राचे कामाकरीता आपल्या मार्फत काम करणारे मे.एन.सी.सी.लि., पुणे यांना खालील नमुद अटीस अधिन राहून, यापुर्वी वाहतूक शाखेचे देण्यात आलेल्या ना-हरकत पत्राची मुदत वाढवुन देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) कामाचे सभावताली बॅरीकेटींग मजबुत लोखंडी स्टीलच्या सहाय्याने करण्यात यावे. त्याची उंची किमान ८.५ फुट असावी जेणेकरुन कुठलीही दुर्घटना होणार नाही. तसेच बॅरिकेटींग सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.
२) नमुद काम सुरु असताना पाण्यामुळे रोड निसरडा होणार नाही याची संबंधितांनी खात्री करावी. त्या दृष्टीने आवश्यकतेनुसार प्लास्टीक बॅरिकेट/पत्र यांचा वापर करुन पाणी साचणार नाही यांची दक्षता घ्यावी.
३) म.न.पा. पुणे कडुन रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येवुन रस्ता समतल करण्यात यावा. व याबाबत मेट्रो रेल्वे प्रशासनाने पुर्तता झाल्याबाबत शपथपत्र सादर केल्यानंतर आवश्यकतेनुसार वाहतुक सुरक्षारक्षक, वाहतुक चिन्हांच्या पाट्या, कोनस्, बॅरिकेट्स, दोर, रिफलेक्टीव्ह जॅकेटस एल.ए.डी. बॅटन, ब्लिंकर्स, इत्यादी संसाधने उपलब्ध करावे. उपरोक्त वस्तुची पुर्तात करुन व सदर बाबत लेखी हमीपत्र या क्यालयास सादर करावे. सदर बाबीची पुर्तता झाल्याशिवाय संबंधितानी काम सुरु करु नये.
४) प्रत्येक रस्त्यावर दोन्ही बाजुने रेडीयम अक्षरातील माहिती दर्शक फलक लावण्यात यावे. वाहनचालकांना माहितीसाठी तसेच मार्गदर्शनासाठी माहितीदर्शक फलक लावण्यात यावे.
५) काम सुरु झाल्यानंतर जमीनीतुन निघणारे मटेरियल उदा. माती,गिट्टी वगैरे मुळे घसरण निर्माण होवुन वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे रस्त्यावर टाकु नये त्याकरीता विशेष व्यवस्था करणेत यावी.
६) काम झाल्यानंतर सदरहु कामामुळे रस्तावर झालेले खड्डे तात्काळ बुजवुन त्यावर सिमेंटीकरण/डांबरीकरण करुन रोड पुर्ववत करावा.
७) ज्याठिकाणी काम सुरु करणार त्या ठिकाणाचा नकाशा त्यास लागणारा कालावधी नमुद करुन अट क्रं. ३ ची पुर्तता झाल्याबाबत नकाशासह कार्यालयाकडुन मान्य (Approved) करुन घ्यावा.
८) पर्यायी मार्ग सुरु होतो त्याठिकाणी व काम करणार आहे त्यामार्गाचे बाजुला लोकांना दिसेल अशा ठिकाणी पर्यायी मार्गाबाबत सविस्तर माहिती असणारे फलक लावण्यात यावेत. तसेच पर्यायी मार्गाची दुरुस्ती करुन घ्यावी.
९) पर्यायी मार्ग सुरु होतो त्याठिकाणी दोन्ही टोकावर तसेच बॅरीकेट्स जवळ रोडवर आपले सुरक्षा रक्षक/स्वयंसेवक नेमावे. त्यांची लेखी माहिती या कार्यालयास सादर करावी.

१०) काम सुरु झाल्यानंतर सदरहु रस्त्यावर बांधकामामुळे किंवा खोदकामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होता कामा नये.

११) कामाचे ठिकाणी सुचना फलक व काम सुरु केल्याची/काम पुर्ण करण्याची दिनांक नमुद करावे. तसेच कंत्राटदाराने स्वतःचा पत्ता व संपर्कासाठी मोबाईल क्रमांक असलेला बोर्ड लावावा.

१२) कामा दरम्यान जास्तीत जास्त मार्ग वाहतुकी करीता उपलब्ध करुन द्यावा.

१३) कामा दरम्यान मार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे अतिक्रमण, खांब, झाडाच्या फांद्या इत्यादी काढुन मार्ग वाहतुकीस मोकळा करण्यात यावा.

१४) पावसाळयात वॉटर लॉकींग होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होता कामा नये.

१५) अनुचित प्रकार घडल्यास कंत्राटदार स्वतः जबाबदार राहतील.

१६) वाहतुक नियमांचे पालन करावे.

१७) वाहतुक पोलीसांनी दिलेल्या दिशा-निर्देशाचे पालन करावे.

१८) सबंधित विभागाची आवश्यक रितसर परवानगी घ्यावी.

१९)वरील नमूद अटींचा भंग झालेचे आढळलेस तात्काळ ना-हरकत पत्र रद्द करण्यात येवून संबंधीतांवर इं.पि.को. कलम २८३, २९१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

२०) सदरचे ना-हरकत पत्र हे दि. १०/०८/२०१९ पासुन दि. ३०/११/२०१९ या कालावधीकरीता वैध राहील.

आम्हास उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेल्या अटी व शर्ती मान्य असुन आम्ही त्यांची पुर्तता करण्याची हमी देत आहोत. अटी आणि शर्तीचा भंग केल्यास कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहु

(श्री. संजय कोरे) - ८६९१०३०२३१
मे. एन.सी.सी.लि. पुणे.

10.08.19
(पंकज देशमुख)
पोलीस उप-आयुक्त वाहतुक
पुणे शहर

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :- सपोआ वाहतूक परि.४ /पोनि येरवडा वाहतूक विभाग, पुणे शहर

सदर ठिकाणी पाहणी करुन संबंधित ठेकेदार यांनी काम सुरु करणेपुर्वी तसेच काम सुरु केलेनंतर ना-हरकत पत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व अटींची त्याचप्रमाणे या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या चेकलिस्टमधील मुद्यांची पुर्तता केली आहे काय? याबाबत वेळोवेळी प्रत्यक्ष खात्री करावी.